कळवण जि.नाशिक
दिनांक ०१/०८/२०२५

# फिर्याद

मनोज रामदास जाधव, वय–३९, धंदा–मजुरी, रा– रविंद्र बाबा कॉलनी, जुनी चित्रकला विद्यालय समोर, शिवाजी नगर, कळवण जि.नाशिक. मो.क्र. ७२७६४७५८५२

मी वरील ठिकाणी आई, पत्नी, मुलांसह एकत्रीत कुटुंबात राहतो व मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी वरील ठिकाणी आई, पत्नी, मुलगा व दोन मुलींसह राहतो व मजुरी करून कुटंबाचा उदरनिर्वाह करतो. आमचे भाउबंदाची वडीलोपार्जित शेतजमीन कळवण खुर्द या गावात असुन सदर शेत जमीनीचा गट नंबर १६८ मौजे कळवण खु.ता. कळवण जि.नाशिक असा आहे. सदर जमीन ही १ हेक्टर ०८ आर असुन आम्ही सातबारा प्रमाणे सर्व भाउबंद वारसदार आहोत. सदर जमीन आम्ही वारसदारांनी प्रकाश देवराम सोनवणे रा.कळवण यांना साधारण ६ वर्षापुर्वी सुमारे ८६ लाख रूपयांस विकली आहे. सदर जमीनीचे प्रकाश सोनवणे यांचेकडुन आम्हास अद्याप पर्यंत ७१ लाख रूपये प्राप्त आहे. सदर जमीनीची प्रकाश सोनवणे यांनी खाजगी मोजणी केली असता सदर शेत जमीन ही १हेक्टर ०८ आर पेक्षा कमी भरत असल्याने त्यांनी उर्वरीत रक्कम १५ लाख रूपये देण्यास नकार देवुन आम्हा वारसदारांच्या विरोधात कळवण येथील मे.सह दिवाणी न्यायाधीश ''क'' स्तर कळवण यांचे न्यायालयात नियीमत दावा क्रमांक ०१/२०२२ प्रमाणे खटला दाखल केलेला आहे.

सदर खटल्यामध्ये दि.२५/११/२०२४ रोजी कळवण न्यायालयाने तालुका अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, कळवण ता. कळवण जि.नाशिक यांना दावा मिळकत गट क्र.१६८ (७/१२ उता–या प्रमाणे गट नं.१६८/अ/१, १६८/अ/२, १६८/ब ) मौजे कळवण ता.कळवण जि.नाशिक या गटाची व पोट हिस्यांची एकत्रित मोजणी करण्यासाठी आदेशीत करून तसा अहवाल दि.०६/१२/२०२४ चे आत न्यायालयात सादर करणेबाबत आदेशीत केलेले आहे. त्यानुसार सदर गट नं.१६८ ची मोजणी ही दि.२१/०५/२०२५ रोजी भुमी अभिलेख कार्यालय कळवण येथील श्री. विजय गवळी यांनी केलेली आहे. परंतु अजुन पर्यंत भुमी अभिलेख कार्यालय येथील श्री. विजय गवळी साहेब यांनी मोजणी केल्याचा अहवाल तयार करून मा.न्यायालयात सादर केला नाही. त्यांमुळे मी त्यांना सदर प्रकरणाला बराच उशीर झालेला असल्याने अहवाल कधी पुर्ण करणार हे माहीती करून घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात दि.२५/०७/२०२५ ला गेलो होतो त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मोजणी जरी पुर्ण झालेली आहे तरी पण त्याचा अहवाल बनवायला वेळ लागतो असे म्हटले त्यावेळी मी त्यांना विनंती केली की कृपया आमचे काम लवकर करून द्या. तेव्हा त्यांनी मला सांगितले की काम लवकर करायचे असतील तर तुम्हाला खर्च करावा लागेल. तेव्हा मी त्यांना विचारले की, किती खर्च लागेल. तेव्हा श्री. विजय गवळी यांनी मला काम करून देण्यासाठी ८०००रू. लागतील असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नंतर येतो असे सांगुन तेथुन निघुन आलो. त्यावेळी सदरची रक्कम ही कोणतीही शासकीय फी नसुन श्री.गवळी साहेब व माझेत कोणताही आर्थिक संबंध किंवा व्यवहार नसल्याने ते माझेकडे मागत असलेली रक्कम ही लाच म्हणुन मागणी करीत असल्याची माझी खात्री झाल्याने व मला श्री.गवळी साहेब यांना लाच देण्याची अजिबात इच्छा नसल्याने मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेशी संपर्क केला. त्याप्रमाणे श्री. संतोष पैलकर, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेकडे मी दिनांक ३०/०७/२०२५ रोजी लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने पोलीस उपअधिक्षक श्री. संतोष पैलकर साहेब यांनी दिनांक ३०/०७/२०२५ रोजी माझे तक्रारीप्रमाणे कळवण भुमी अभिलेख कार्यालयातील लोकसेवक विजय गवळी हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करणेकामी मला व पंच श्री. संग्राम तांगडे अशांना पडताळणी

कळवण पो.स्टे CCTNS गु.र.नं 290/25 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दा. 01/08/2025 वा. 02/22 वा. स्टे.डा.क्र. 02/25

Ridale

कारवाई कामी आवश्यक सुचना देवुन माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करून देवुन ठरले प्रमाणे भुमी अभिलेख कळवण येथे लोकसेवक विजय गवळी यांचे भेटीसाठी १६:४२ वाजता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच श्री. तांगडे असे आम्ही भुमी अभिलेख कार्यालय कळवण येथे गेलो व तेथे लोकसेवक विजय गवळी यांची भेट घेतली असता, त्यांनी आमचे शेतजमीन मोजणी केलेचा अहवाल तयार करून सादर करण्याचे मोबदल्यात माझे कडे ८०००रू. मागणी करून लागलीच ३०००रू. अगोदर दया व उर्वरीत पैसे काम झालेनंतर असे सांगितले. परंतु माझे कडे पैसे कमी असल्याने मी त्यांना थोडया वेळाने ३०००रू. कळवण येथुन घरून पैसे आणुन देतो असे सांगितले त्यावर श्री.गवळी यांना घरी जायचे असल्याने त्यांनी ठिक हे बघु नंतर असे म्हणुन (हाताचे इशाऱ्याने उद्या या ) असे म्हणुन सदरची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसा सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर दि.३१/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथील श्री.संतोष पैलकर, पो उप अधीक्षक यांचेकडे ३०००/–रू. लाचेची रक्कम हजर केली. त्यावेळी सापळा पथकाने माझेकडील ३०००/– रूपये ज्यात ५००/– रू. दराच्या ०६ चलनी नोटांना अॅन्थ्रॉसिन पावडर लावुन सदर नोटा घेवुन व्हॉईस रेकॉर्डरसह मी व पंच श्री. तांगडे यांचेबरोबर कळवण भुमी अभिलेख कार्यालयातील लोकसेवक विजय गवळी यांना भेटण्यासाठी गेलो. तेथे जावुन मी व पंच नं. १ असे भुमी अभिलेख कार्यालय, कळवण येथे लोकसेवक विजय गवळी यांची भेट घेतली व त्यांनी माझेशी कामासंदर्भात चर्चा करतांना सदर लाचेची रक्कम त्यांचे समोर ठेवलेल्या कागदात ठेवण्यास सांगुन त्यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाचेची रक्कम ३,०००/– (तीन हजार रूपये) रूपये पंच साक्षीदारासमक्ष लोकसेवक विजय गवळी यांनी माझेकडुन स्विकारली असता त्यांना १६:३० वाजेचे सुमारास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर कारवाई बाबत सविस्तर यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी मी दिनांक ३०/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक येथील श्री.संतोष पैलकर, पो उप अधी यांचेकडे कळवण येथे दिलेल्या तक्रारी अर्जावर कारवाई करून कळवण भुमी अभिलेख कार्यालयातील लोकसेवक विजय गवळी यांनी आमचे वडिलोपार्जित शेत जमीनीचे मोजणी केलेले असुन त्याचा अहवाल तयार करून सादर करण्याचे मोबदल्यात ८०००/–रू. लाचेची मागणी करून त्यापैकी ३०००–रू. कळवण भुमी अभिलेख कार्यालयातील लोकसेवक विजय गवळी यांनी दिनांक ३१/०७/२०२५ रोजी १६: ३० वाजेचे सुमारास उप अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय कळवण येथे पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली आहे.

तरी विजय गवळी, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, कळवण यांनी आमचे वडिलोपार्जित शेत जमीनीचे मोजणी केलेले असुन त्याचा अहवाल तयार करून सादर करण्याचे मोबदल्यात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी ८०००/–रू. लाचेची मागणी केलेल्या रकमेपैकी ३०००–रू. लाचेची रक्कम कळवण उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालयात लोकसेवक विजय गवळी यांनी दिनांक ३१/०७/२०२५ रोजी १६:३० वाजेचे सुमारास पंच साक्षीदारासमक्ष स्विकारली आहे. म्हणुन माझी विजय हनुमंत गवळी, वय–४३, धंदा– नोकरी, नगर भुमापक लिपीक अतिरिक्त कार्यभार निमतानदार, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, कळवण रा– नम्रता रो हाउस नं.४, वरद नगर, बोरगड, म्हसरूळ, नाशिक यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर टंकलिखील केलेली असुन बरोबर आहे.

**समक्ष**

(signature) R. dalke
पोलिस ठाणे अमंलदार
कळवण पो.ठाणे
HC2240 पी.के दिडके

**हि फिर्याद दिली.**
दिनांक ०१/०८/२०२५
(signature)
मनोज रामदास गायकवाड